# दलित समाजाच्या जडणघडणीत भीमगीतांची भूमिका

**प्रा. किरण नाईकनवरे,** सहाय्यक प्राध्यापक विभाग : समाजशास्त्र श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर पुणे

---

**गोषवारा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजात युगानुयुगे जातीय विषमतेला बळी पडलेल्या लाखों शोषित, पीडितांना माणूस म्हणून जीवन जगण्याचा अधिकार बहाल केला. अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या समाजात आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण करून त्या समाजाला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्य याची जाणीव करून देण्याचे कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. बाबासाहेबांच्या विचारांनी गतिशील असणाऱ्या चळवळीचा एक महत्त्वाचा भाग म्हणून भीमगीते मानवमुक्तीच्या सांस्कृतिक चळवळीचे एक प्रभावी माध्यम म्हणून पुढे आले. आज भारतीय समाजात भीमगीतांना एक अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून भीमगीते संगीतातील एक अतिशय महत्त्वाचा लोकप्रिय प्रकार म्हणून आकार घेत आहे. भीमगीतांची व्याप्ती ही केवळ दलित समाजापुरती मर्यादित राहिली नसून ती भारतातील कानाकोपऱ्यात पोहोचली आहे.

**बीजसंज्ञा :**

आंबेडकरी चळवळ, भीमगीत, दलित, भारतीय समाज इत्यादी

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील सामाजिक विषमतेविरुद्ध लढा देऊन तळागाळातील सर्व सामान्यांना मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले आणि त्यांना सर्वशक्तिनिशी जागे करून हक्काने जगण्यास शिकवले. शोषित, पीडित समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी आपलं उभं आयुष्य वेचलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संपूर्ण जीवनप्रवास शोषितांसाठी केलेल्या संघर्षाची साक्ष देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, विचार, संघर्ष भारतीय समाजातील दलित, वंचित, स्त्रिया, मुले वृद्ध तसेच गावा खेड्यातील वस्ती तांड्यावरील अज्ञानी लोकांपर्यंत कसे पोहोचणार? त्यांना बाबासाहेब कसे कळणार? त्यांचे विचार जनमाणसात कसे रुजणार? या उद्देशाने भीमगीतांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, संघर्ष, कार्य आणि विचार सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या भीमगीतांची भूमिका अतिशय प्रभावी आणि महत्त्वाची ठरली. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात दलित समाजाच्या जडण घडणीत भीमगीतांची भूमिका यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

1. प्रबोधनात्मक भीमगीतांचे महत्त्व अधोरेखित करणे.
2. दलित समाजाच्या जडण घडणीत भीमगीतांची भूमिका अभ्यासणे.

**शोध निबंधाची गृहीतके :**

1. भीमगीते दलित समाजाचा अत्यंत अभिमानाचा विषय आहे.
2. भीमगीतांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, विचार घराघरात पोहोचले आहे.

**माहिती संकलनाचे स्रोत :**

दलित समाजाच्या जडण घडणीत भीमगीतांची भूमिका या विषयावरील शोध निबंध लिहण्यासाठी माहिती संकलनाच्या दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे. वर्तमान पत्रे, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित लेख, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे.

**विषय विवेचन :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, समाजसुधारक, संशोधक, पत्रकार, लेखक, इतिहासकार, न्यायशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, मानववंश शास्त्रज्ञ, राजनीतीतज्ज्ञ, दलितांचे कैवारी, स्त्री मुक्तीचे प्रणेते, बौद्ध साहित्याचे अभ्यासक, जलतज्ज्ञ, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, देशातील पहिले कामगारमंत्री, शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे उद्धारक, दलित बौद्ध चळवळीचे प्रेरणास्थान आणि भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा पट खूप मोठा आहे.

विषमतावादी जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजातील शूद्रातिशूद्र समाजाचा विकास खुंटला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीय विषमतेची उतरंड मोडून काढण्यासाठी समता आणि तर्कसंगततेवर आधारित सामाजिक पुनर्रचनेची संकल्पना मांडून शूद्रातिशूद्र समजल्या जाणाऱ्या समाजाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करत समाज परिवर्तनाला दिशा दिली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय, या तत्त्वांवर आधारलेली जातीय विषमतेच्या विरोधी चळवळ त्यांनी सुरू केली. जातीव्यवस्था नष्ट व्हावी म्हणून त्यांनी सवार्थाने प्रयत्न केले. भारतातील सामाजिक विषमतेविरुद्ध लढा देऊन त्यांनी तळागाळातील सर्व सामान्यांना मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले आणि त्यांना सर्वशक्तिनिशी जागे करून हक्काने जगण्यास

शिकवले. शोषित समाजाची प्रगती, महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, शेतकऱ्यांसाठी खोती पद्धतीचा लढा, गोलमेज परिषद, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्ष, बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षण संस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, भारतीय संविधानाची रचना, स्त्रियांसाठी हिंदू कोड बिल, स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग, धर्मांतर अशा कार्यांसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतले. सामाजिक विषमतेला बळी पडलेल्या शूद्रातिशूद्र समजल्या जाणाऱ्या समाजाच्या विकासासाठी संघर्ष करून समाजात समता व न्यायाची स्थापना केली. प्रज्ञा, शील आणि करूणा या त्रिसरणीचा त्यांनी पुरस्कार केला. अन्यायाविरुद्ध बंड पुकारण्यासाठी त्यांनी कायद्याचं शस्त्र वापरलं. त्यांनी सबंध शोषित, पीडित समाजाला शिक्षणासाठी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे महान कार्य समाजातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक कार्यकर्ते, समाजसुधारक आणि लोककलावंत हे आंबेडकरी चळवळीकडे आकर्षित झाले. आंबेडकरी चळवळ ही केवळ एक राजकीय चळवळ नसून प्रबोधनात्मक, परिवर्तनवादी, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ आहे. त्यामुळे प्रबोधनात्मक कार्यक्रम, दलित साहित्य, नाटके, जलसे आणि भीमगीते ही या चळवळीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. आंबेडकरी चळवळीने कलात्मक पैलूच्या आधारे शोषितांच्या अस्मिता, आत्मसन्मान आणि संघर्ष संगीतांमधून मांडून प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध उठाव केला. बाबासाहेबांच्या विचारांनी गतिशील असणाऱ्या चळवळीचा एक महत्त्वाचा भाग म्हणून भीमगीते मानवमुक्तीच्या सांस्कृतिक चळवळीचे एक प्रभावी माध्यम म्हणून पुढे आले.

**प्रबोधनात्मक भीमगीते :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर, कार्यांवर, विचारांवर आणि संघर्षावर रचलेल्या किंवा गायलेल्या प्रबोधनात्मक गीतांना भीमगीते असे म्हटले जाते. भीमगीतांना जयभीमगीत, आंबेडकर गीत किंवा आंबेडकवादी गीत असे देखील म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खडतर जीवन प्रवास, कार्य, विचार भीमगीतांच्या माध्यमातून मांडले जाते.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर संगीतांच्या माध्यमातून बाबासाहेब यांचे जीवन, कार्य, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचार, त्यांचा संघर्ष तसेच शोषित, पीडित दलित समाजाने भोगलेल्या व्यथा, वेदना, भाव भावना, त्यांच्या दैनंदिन जीवनातील समस्या, त्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती आणि संघर्ष भीमगीतांमधून मांडण्यास सुरुवात झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे दलितांची परिस्थिती कशी बदलत गेली. हे देखील भीमगीतांच्या माध्यमातून सांगण्यास सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयातीत असताना देखील भीमगीते गायली जात होती, आंबेडकरी जलसे होत होते. बाबासाहेबांच्या भाषणापूर्वी भीमगीते सादर केली जात असत. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की, 'माझ्या एका शाहिराचं गीत माझ्या दहा भाषणांच्या बरोबर आहे'. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी जलसे व प्रबोधनात्मक भीमगीतांचे वारे वेगाने वाहू लागले. वेगवेगळ्या ठिकाणी भीमगीते ही सामुहिक पद्धतीने जलशांच्या माध्यमातूनही प्रस्तुत केली जाऊ लागली. अनेक शाहीर, लोककवी, हिंदी-मराठी गायकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संपूर्ण जीवन संघर्ष, सामाजिक व शैक्षणिक कार्य, विचार, महिला, शेतकरी कामगार वर्गासाठी दिलेला लढा इत्यादी प्रसंग भीमगीतांच्या माध्यमातून मांडण्यास सुरुवात केली. या भीमगीतांमधून बाबासाहेबांचे बालपण, शिक्षण, त्यांचे वडील रामजी सकपाळ, आई भीमाबाई सकपाळ आणि पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे संघर्षमय जीवन, सहकारी, त्यांचे विचार, त्यांचे कार्य इत्यादी घटनांची वर्णने आढळतात. तर काही भीमगीतांमधून उच्चवर्णीयांनी दलित समाजाची केलेली उपेक्षा प्रकर्षाने प्रस्तुत केली जाते. भीमगीतांमधील प्रत्येक ओळींना विशेष असे सामाजिक संदर्भ लाभले आहेत. बाबासाहेबांचा जीवनाचा असा कोणताही प्रसंग नाही जो भीमगीतात व्यक्त झाला नाही.

**भीमजयंती आणि भीमगीते :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने संपूर्ण भारतात लाखों नागरिक बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करतात व अभिवादन करतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपूर्ण जगभरात मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. विशेषतः भीमगीतांच्या माध्यमातून बाबासाहेबांना आदरांजली देऊन त्यांचे अभिवादन केले जाते आणि त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. त्यांचे कार्य, विचार आणि जीवन संघर्ष भीमगीतांच्या माध्यमातून जनमाणसापर्यंत पोहचवले जातात. भीमगीते आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा एक अविभाज्य भाग झाली आहेत. कारण जो दलित समाज वर्षानुवर्षे मूलभूत हक्क आणि अधिकारांपासून दूर ठेवला गेला होता. त्या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे मुक्तपणे जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले. म्हणून हा समाज चौकाचौकात भीमगीते वाजवून, भीमगीतांच्या स्पर्धा घेऊन तसेच वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून भीमजयंती साजरी करत असतो. भीमगीतांच्या माध्यमातून दलितांच्या रोजच्या जगण्यातील समस्या आणि संघर्ष मांडला जातो. त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचे वर्णन केले जाते. तसेच त्यांची परिस्थिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे कशी बदलत गेली याची देखील मांडणी केली जाते. महाराष्ट्रातच

नव्हे तर संपूर्ण भारतातील दलित समाजाच्या हृदयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी मानाचे स्थान आहे. दलित समाज हा एखाद्या देवतेच्या रुपातच बाबासाहेबांना पुजतो. तर कधी बाबासाहेबांना आपला बाप मानतो. थोडक्यात बाबासाहेबांची जयंती ही भीमगीतांशिवाय पूर्ण होत नाही.

**शोषित, पीडित दलित समाजाच्या जडणघडणीत भीमगीतांची भूमिका :**

दलित समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपला मसिहा मानतो. त्यांनी दलितांना गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी आत्मसन्मानाचा नवीन मार्ग दाखविला. दलितांच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. हजारो वर्षे जातीयतेच्या गाळात आणि दारिद्र्यांत खितपत पडलेल्या या समाजाला स्वतःचे अस्तित्व आणि अस्मिता याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे झाली. बाबासाहेब यांचे कार्य आणि विचार दलितांसाठी प्रेरणा ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे व्यक्तिमत्व, स्वभाव, जीवन संघर्ष, कार्य आणि विचार खऱ्या अर्थाने या भीमगीतांतूनच तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचले. भीमगीतांच्या माध्यमातून दलित समाजावर आंबेडकरी विचारांचा प्रभाव जास्त पडल्याचे दिसून येते. भीमगीतांमध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय ही मुल्ये प्रकर्षाने जाणवतात. भीमगीते शोषित, पीडित समाजाला गुलामगिरी, चाखरी, लाचारी सोडून स्वाभिमानाने जगायला शिकवते. विद्या, करुणा अशी मुल्ये अंगीकारायला शिकवते. म्हणून दलित समाजात भीमगीतांना विशेष असे महत्त्व आहे. भीमगीते दलित समाजाला जीवनाच्या प्रत्येक सुख-दुःखाच्या प्रसंगात जगण्यासाठी, लढण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी प्रेरणा देतात. भीमगीते आज दलित समाजातील प्रत्येक घरात पोहोचली असून अगदी लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनाच भीमगीते तोंडपाठ आहेत. नवीन पिढीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित पिडीत दलित समाजाच्या कल्याणासाठी, शिक्षणासाठी तसेच स्त्रियांसाठी, शेतकऱ्यांसाठी, मजुरांसाठी केलेल्या महान कार्याची ओळख करून देण्यासाठी ही भीमगीते प्रेरणादायी ठरतात. लहानपणापासून दलित समाजातील मुलांवर भीमगीतांचे संस्कार कळत नकळत होत असतात. भीमगीते ऐकत, म्हणत आणि भीमगीतांवर नाचतच ही मुले मोठी होतात. भीमगीते प्रत्येकाच्या मनामध्ये ऊर्जा निर्माण करतात आणि प्रेरणा देतात. त्यामुळे दलित समाजाच्या जडणघडणीत भीमगीतांची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. कारण भीमगीतांनी दलित समाजाला जागृत करण्याचे कार्य मोठ्या ताकदीने केले आहे.

**समारोप :**

प्रबोधनात्मक भीमगीतांच्या माध्यमातून बाबासाहेब यांचे जीवन, कार्य, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचार, त्यांचा संघर्ष हा समाजापुढे मांडला जातो. इतकेच नव्हे तर प्रबोधनात्मक भीमगीतांच्या माध्यमातून शोषित, पीडित दलित समाजाची परिस्थिती, त्यांचे जीवन, त्यांचा संघर्ष येणाऱ्या पिढीपर्यंत पोहोचविला जातो. आज भारतात मराठी, हिंदी, पंजाबी, कन्नड अशा विविध भाषांमध्ये हजारो भीमगीते उपलब्ध आहेत. तसेच प्रत्येक वर्षी अनेक नवनवीन भीमगीते प्रसिद्ध होत असतात. ही भीमगीते प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, तथागत भगवान गौतम बुद्ध जयंती, महापरिनिर्वाण दिन, धम्मचक्र प्रवर्तन दिन, रमाबाई आंबेडकर जयंती व इतर सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उत्सवांमध्ये अतिशय उत्साहाने वाजवली जातात. आज भारतीय समाजात भीमगीतांना एक अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून भीमगीते संगीतातील एक अतिशय महत्त्वाचा लोकप्रिय प्रकार म्हणून आकार घेत आहे. तसेच भीमगीतांची व्याप्ती ही केवळ दलित समाजापुरती मर्यादित राहिली नसून ती भारतातील कानाकोपऱ्यात पोहोचली असून दलित समाजाच्या जडणघडणीत ही प्रबोधनात्मक भीमगीते महत्त्वाची भूमिका बजावतात. भीमगीतांतील प्रत्येक शब्दांतून भगवान गौतम बुद्ध, बौद्ध धम्मातील मानवतावादी विचार, आचारसंहिता, नीतीमुल्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य, माता रमाई यांचे कष्ट व त्याग पुढल्या पिढीपर्यंत पोहोचले आहे

**संदर्भ सूची :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, खंड १८
2. निकुंभे, सी. एच. (२००५) समाज प्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे,
3. गायकवाड ज्ञानराज (२०१३) महामानव : डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर,
4. दैनिक सकाळ (२०२२) भीमगीत आणि आंबेडकरी चळवळ
5. आधुनिक केसरी (२०२३), आंबेडकरी चळवळ आणि लोककलावंतांचे सांस्कृतिक नवचैतन्य
6. लोकसत्ता (२०२४), गीतांचा भीमसागर... चळवळीची गाणी
7. दैनिक सकाळ (२०२४), आंबेडकरी चळवळ : सांस्कृतिक - सांगीतिक
8. https://www.bbc.com/marathi/articles/ce9vw4zykpro